# प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०५.०९.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | केशव भिमराव मदने , वय ३७ वर्षे, पद–ग्रामसेवक, ग्राम वाटोळा खुर्द पंचायत ता.तिवसा जि.अमरावती रा.ब्राम्हणवाडा थडी ता.चांदुर बाजार जि.अमरावती (वर्ग–३) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०५/०९/२०२३ चे १३/४५ ते १५/४०वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ९२,०००/–रुपये |
| ५ | तडजोडीअंती लाच रक्कम | ७०,०००/– रूपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ५०,०००/–रुपये |
| ७ | घटनास्थळ | पंचायत समिती तिवसा ता.तिवसा जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** :यातील तक्रारदार यांनी दिनांक २३/०८/२०२३ रोजी तक्रार दिली की, ग्रामसेवक केशव मदने हे त्यांनी ग्रामपंचायत वाटोळा खुर्द येथे केलेल्या सिमेंट कॉक्रीट नाली बांधकामाचे २००,०००/– व सिमेंट कॉक्रीट रस्ता बांधकामाचे २,७७,०००/– एकुण ४,७७,०००/– रू झालेल्या कामाचे नोटशिट तयार करून बिल मंजुरीसाठी पाठवल्याचे व मागील कामाचे मंजुर झालेल्या बिलाच्या मोबदल्यात ९२,०००/– रु. लाचेची मागणी करत असल्याबाबत लेखी तक्रार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२४/०८/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान ग्रामसेवक केशव मदने यांनी ग्रामपंचायत वाटोळा खुर्द येथे केलेल्या कामाचे व मागील कामाचे असे एकुन ९२,०००/– रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ७०,०००/– रूपये स्विकारण्याची तयारी दाखवुन पहीला हप्ता ५०,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केल्याचे निष्पन्न झाले वरुन दिनांक ०५/०९/२०२३ रोजी पंचासमक्ष आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक केशव भिमराव मदने वय –३७ वर्ष, ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाटोळा खुर्द यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम ५०,०००/– रु. पंचासमक्ष स्विकारली वरुन आजरोजी वर नमुद आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द पो.स्टे.तिवसा जि.अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र, श्री.शिवलाल भगत, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.केतन मांजरे,मपोनी विजया पंधरे, पोलीस अंमलदार वैभव जायले,नितेश राठोड,युवराज राठोड,आशिष जांभोळे,चालक पोउपनि.सतिश किटूकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर–१०६४.

(केतन मांजरे)
पेलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.न.८८८८६०२९२०